| MHNS240001782026 | रे. मु. नं. ४५/२०२६<br>आप्पा झिंगा तलवारे<br>विरुद्ध<br>बंडू गोमा तलवारे |
|---|---|

# निशाणी क्र.५ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश ३९ नियम १ व २ अन्वये वादी यांच्या दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी स्वतः अथवा ति–हाईत इसमामार्फत हरकत अथवा अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त ताकीदीची मागणीकरीता दाखल केला आहे.

**०२. वादी थोडक्यात असे कथन की,**

**दावा मिळकतीचे वर्णन–**

मौजे निंबोळे, ता. देवळा, जि.नाशिक येथील वादींच्या कब्जा वहीवाटीत असलेल्या मिळकतीचे वर्णनः–

| गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार |
|---|---|---|
| २०४/१ | ब) पो.ख.क्षेत्र ८७.५३.०० पैकी ०.४० आर | ०.०० रु.पै. |

यांसी जंगल परिस्थीतीनुसार चतुःसिमाः–

**पुर्वेस** – जिभाउ कारभारी तलवारे यांच्या कब्जातील जमिन.

**पश्चिमेस** – वसंत फकिरा गो–हे.

**दक्षिणेस** – डोंगर.

**उत्तरेस** – पाट कॅनल...... **(संक्षिप्तात "दावा मिळकत")**

**०३.** वादी यांनी कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे अनुसूचित जमातीतील आदिवासी असून नात्याने भाऊबंद आहेत. वादग्रस्त शेतजमीन मूळतः

महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या ताब्यात होती. वादी क्र.१ चे वडील झिंगा जयवंत तलवारे यांनी सुमारे ५५–६० वर्षांपासून त्या जमिनीवर कब्जा ठेवून शेती केली होती. त्यांच्या मृत्यूनंतर वादी क्र.१ यांनी शेती सुरू ठेवली. सन २०२० मध्ये शासनाच्या आदेशानुसार सदर जमीन वादी क्र.१ व २ यांच्या नावे देण्यात आली व त्याबाबत अधिकृत प्रमाणपत्र तसेच महसुल नोंद फेरफार क्र. ३१६१, दि. ०५/०३/२०२२ करण्यात आली. त्यामुळे वादी क्र.१ व २ हे कायदेशीर मालक झाले आहेत. सध्या ते या जमिनीवर बाजरी, मका, कांदा, गहू इत्यादी पिके घेत असून सध्या कांद्याचे पीक घेतले आहे.

**०४.** वादी यांनी पुढे कथन केले आहे की, प्र.वादी क्र. २, ३ व इतर यांच्या नावावर मौजे निंबोळा, ता. देवळा, जि. नाशिक येथील गट नं. २०४/१ मधील जमिनीचा काही भाग आहे, जो वादीच्या जमिनीपासून पूर्णतः वेगळा असून त्याबाबत स्वतंत्र फेरफार नोंदी आहेत. वादीच्या मालकी व कब्जातील ०.४०.०० हे. आर. क्षेत्राशी प्र.वादींचा कोणताही संबंध नसताना, त्यांनी वादीला त्रास देणे, पिकांचे नुकसान करणे व वाद निर्माण करणे सुरू ठेवले आहे. त्यामुळे वादीने हा दावा व तात्पुरत्या मनाई हुकुमासाठी अर्ज दाखल केला आहे. दाव्याचा निकाल लागण्यास वेळ लागणार असून वादीचा प्रथमदर्शनी मजबूत दावा आहे. मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल, तर तो दिल्यास प्र.वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादी यांना सदर तुर्तातूर्त ताकीद अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**०५.** प्रतिवादीने निशाणी १७ वर वादीच्या निशाणी ५ च्या अर्जास जबाब दाखल करुन वादी यांचे अर्जास हरकत नोंदविलेली आहे. सदर मिळकत प्रतिवादीच्या कब्जात असून त्यावर त्यांचा मालकीहक्क आहे; वादीचा कोणताही हक्क किंवा हितसंबंध नाही. वादीने कोणतेही वैध कारण नसताना दावा दाखल केला आहे. सन २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाने गट नं. २०४/१ मधील १ हे. ७४ आर क्षेत्र प्र.वादी क्र. २ व ३ यांना वनहक्कांतर्गत दिले असून त्याबाबत प्रमाणपत्र व महसुल नोंदी

करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्र.वादी क्र. २ व ३ हे कायदेशीर भोगवटदार मालक ठरतात. सदर जमिनीत वादी कांदा इत्यादी पिके घेत असून सध्या देखील कांद्याचे पीक घेतले आहे.

**०६.** प्रतिवादी पुढे कथन करतात की, प्र.वादी क्र. २ कैलास, क्र. ३ वसंत गोमा तलवारे व इतर यांच्या नावे मौजे निंबोळा, ता. देवळा, जि. नाशिक येथील गट नं. २०४/१ मधील १.७४ हे. आर. जमीन शासनाने दिलेली आहे. त्यापैकी ०.४० आर क्षेत्रावर वादींनी अतिक्रमण केल्याचा कोणताही मोजणी अहवाल किंवा पुरावा नाही. तसेच वादींना त्यांच्या दाव्याची अचूक माहिती नसताना त्यांनी खोटा दावा दाखल केला आहे. त्यामुळे सदर दावा फेटाळण्यास पात्र आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

**०७.** वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न अवलोकनार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष, कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादींनी सकृतदर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| **२.** | न्यायाचा समतोल वादींचे बाजूने आहे, असे वादींनी शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| **३.** | तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे असे वादींनी शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| **४.** | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

०८.	वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयार्थ खालील नमुद कागदोपत्री पुराव्यावर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

| अ. क्र. | दस्तऐवजाचे वर्णन | तारिख |
|---|---|---|
| १. | गट नं. २०४/१ चा ७/१२ उतारा, मुळ प्रत. सही शिक्का प्रत. | २२.०१.२०२६ |
| २. | फेरफार नोंद ३१६१ ची नोंद online | २०.०१.२०२६ |
| ३. | ताब्यात असलेल्या वन जमिनीचा मालकी हक्क प्रमाणपत्र ची नक्कल प्रमाणितप्रत. | ३०.०९.२०२० |
| ४. | दंड पावती नक्कल | ०७.१०.१९६८ |
| ५. | वादी क्र.१ चे आधारकार्ड प्रमाणीतप्रत. | --------- |
| ६. | वादी क्र.२ चे आधारकार्ड प्रमाणीतप्रत | --------- |

०९.	प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयार्थ खालील नमुद कागदोपत्री पुराव्यावर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

| अ. क्र. | दस्तऐवजाचे वर्णन | तारिख |
|---|---|---|
| १. | गोमा फकिरातलवारे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. | २६.१२.२०१३ |
| २. | सर्वे नं. २०४/१ व २०४/२ प्लॉट रिपोर्ट झेरॉक्स प्रत. | -------- |
| ३. | फेरफार नोंद क्र. २१८३ झेरॉक्स प्रत. | -------- |
| ४. | कारभारी गोमा तलवारे आधारकार्ड झेरॉक्स प्रत. | -------- |
| ५. | फेरफार नोंद क्र. १ झेरॉक्स प्रत. | -------- |
| ६. | फेरफार नोंद क्र. ३५५ झेरॉक्स प्रत. | -------- |
| ७. | शासन आदेश झेरॉक्स प्रत. | १०.११.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ८. | गट नं. २०४/१ चा ७/१२ उतारा झेरॉक्स प्रत. | ०४.०२.२०२६ |
| ९. | फेरफार नोंद क्र. २३४४ झेरॉक्स प्रत. | ०९.०३.२०२६ |

**१०.** वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. याशिवाय प्रतिवादीतर्फे लेखी युक्तीवाद निशाणी २४ दाखल करण्यात आला आहे.

## कारणमिमांसा

**११.** प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरीता आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली करताना खालील गोष्टींची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**अ.** सकृतदर्शनी केस.

**ब.** अपरिमित नुकसान.

**क.** सोयीचा समतोल.

**मुद्दा क्रमांक १ करीता :-**

**१२.** मुद्दा क्रमांक १ हा सकृतदर्शनी केस यासंबंधी आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये सकृतदर्शनी केस याबाबत व्याख्या दिलेली नाही. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध न्यायनिवाडयांमध्ये सकृतदर्शनी केस निश्चित केलेली आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे जर एखादया गोष्टीचे पुरावे दिले गेल्यास ती गोष्ट शाबीत होईल. थोडक्यात सकृतदर्शनी केस म्हणजे वादीच्या यशाची शाश्वती.

**१३.** प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी दावा मिळकत गट क्र. २०४/१ मधील ४० आर क्षेत्र त्यांच्या मालकीची असल्याचे कथन केले आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी क्र. १ चे वडिल झिंगा तलवारी हे सुमारे ५५ ते ६० वर्षापासून कसत आहे सन २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाद्वारे वादी यांच्या लाभात

दावा मिळकती संदर्भात प्रमाणपत्र रुजू करण्यात आली. त्याबाबतची फेरफार क्र. ३१६१, दि.०५.०३.२०२२ रोजी प्रमाणित करण्यात आले. त्याद्वारे वादी हे दावा मिळकतीचे मालक झालेले आहे. याउलट प्रतिवादी यांनी वादी यांचा मालकी हक्क नाकारुन संपूर्ण दावा मिळकती त्यांची कब्जेवहिवाट व मालकी कथित केली आहे. उभय पक्षकारांमध्ये मुळ व ठराव दावा मिळकतीवरील ताबा व मालकी संदर्भातील आहे.

**१४.** प्रस्तुतचा दावा वादी यांनी दावा मिळकतीवरील मालकीच्या जाहिर ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी दावा मिळकतीवरील ताबा व मालकी दर्शविण्याकरीता दावा मिळकतीचा ७/१२ उतारा सादर केलेला आहे. सदर उता–याचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीच्या भोगवटादार सदरी महाराष्ट्र शासन राखीव वन विभाग पूर्व भाग नाशिक यांची नोंद दिसून येते. सदर उता–याच्या इतर व अधिकारासदरी वादी यांच्या नावाची नोंद ४० आर इतक्या क्षेत्रास असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. याउलट, प्रतिवादी क्र. २ व ३ सह कैलास गोमा तलवारे व मिराबाई राजेंद्र पवार यांचे नावाची नोंद १ हे. ७४ आर. इतक्या क्षेत्रास सकृतदर्शनी दिसून येते. याशिवाय, वादी यांनी फेरफार क्र.३१६१ सादर केलेले आहे. सदर फेरफाराप्रमाणे वादी यांनी दावा मिळकत ही शासन महसून व वन विभाग यांचेकडील परिपत्रकाद्वारे वादीस देण्यात आल्याचे स्वकृतदर्शनी दिसून येते. याशिवाय, वादी यांचे नावे असलेले प्रमाणपत्र दि.३०.०९.२०२० चे अवलोकन केले असता, वादी यांना मौजे निंबोळा मधील ४० आर इतके क्षेत्र देण्यात आल्याचे स्वकृतदर्शनी दिसून येते.

**१५.** प्रतिवादी यांनी सदर ७/१२ उतारा, फेरफार क्र. ३१६१ व प्रमाणपत्र याबाबत हरकत नोंदविली हे दर्शविण्याकरीता कोणतेही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. याउलट, प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमधील परिच्छेद क्र.११ मध्ये दावा मिळकतीमध्ये वादी क्र. १ व २ हे कांद्याचे पिक घेत असल्यासंदर्भात कबूली दिली

आहे. सदरची बाब ही सकृतदर्शनी दावा मिळकतीवर वादी यांचे कब्जेवहिवाट असल्याचे दर्शवते. प्रतिवादी यांनी वादी यांचे कथन व कागदोपत्री पुराव्याचे खंडण करण्याकरीता स्वकृतदर्शनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. सबब, दावा मिळकतीवर सद्यघडीस वादी यांचा कब्जा असल्याचे व त्यास प्रतिवादी हरकत अडथळा करत असल्याची बाब स्वकृतदर्शनी स्पष्ट होते. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ व ३ करीता :–**

**१६.** मुद्दा क्रमांक २ हा अपरिमित नुकसान व मुद्दा क्रमांक ३ हा सोयीचा समतोल याच्याशी निगडीत असल्यामुळे सदरचे दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न आहेत. सबब, पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेकरीता उपरोक्त दोन्ही मुद्दे एकत्रित विवेचित केले आहेत.

**१७.** कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार वादीने केवळ सकृतदर्शनी केस शाबीत करणे योग्य नाही. त्याचबरोबर त्यांनी तुर्तातूर्त मनाई न दिल्यास त्यांना अपरिमित असे नुकसान होवू शकते तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे. वादीच्या कथनाप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होऊ शकते. उपरोक्त चर्चेदरम्यान यापूर्वीच वादी यांना सकृतदर्शनी केस असल्याबाबत निष्कर्ष नोंदविलेला आहे.

**१८.** दावा मिळकत ही वादी यांचे मालकीचे व कब्जेवहिवाटीचे असल्याचे पटलावरील पुराव्यावरुन सकृतदर्शनी दिसून येते. याशिवाय प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यास दिलेल्या कैफियतीबाबत वादीच्या दावा मिळकतीवरील कब्जा व मालकी नाकारलेली आहे. अशा परिस्थीमध्ये वादी यांच्या कब्जा व वहिवाटीस होत असलेली हरकत व अडथळा स्वकृतदर्शनी स्थापित होते. त्यामुळे दाव्याच्या या स्थितीमध्ये वादी यांचा दावा मिळकतीवरील ताबा जतन न केल्यास वादी यांचे अपरिमीत नुकसान संभवते. याशिवाय, दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता दिसून येते. याशिवाय बहुविविध दाव्यांची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थीतीत वादी यांना मालकी व कब्जास हक्कास मुकावे लागण्याची शक्यता देखील सकृतदर्शनी नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा साकल्याने विचार केला असता, वादी यांचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे निदर्शीत होते. त्यामुळे कायद्याचे समतोल देखील

वादी यांच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत मनाई नाकारल्यास वादीचे नुकसान संभवते. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करीता –**

१९. मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचनावरुन वादीस प्रथमदर्शनी केस आहे, तसेच सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान देखील वादीचे होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाकरीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

| आ दे श | |
|---|---|
| १. | वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी ०५) मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जे वहिवाटीस दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत स्वतः अथवा गडीमाणसे, नोकर, एजंट अन्य त्रयस्थ इसमांमार्फत हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते. |

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.04.07 16:22:46 +0530

ठिकाण – सटाणा.
दिनांक – ०७.०४.२०२६.

( मधुसूदन दिनकर महाडीक )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सटाणा.